## सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.०९ डिसेंबर, २०११ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची तिसरी सभा दि.०९ डिसेंबर, २०११ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ.बंडगर बी.पी. | अध्यक्ष |
| २) | मा. प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन, प्रभारी कुलगुरु तथा संचालक म. व वि.वि.मं. | सदस्य |
| ३) | डॉ. नवले एस. एम. | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ.देशमुख ए.एल. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ.गोसावी एस.एन. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १२) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. पुजारी ए. जी. | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ.श्रीमती वडवान एम.ए.एम. | सदस्या |
| १६) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १७) | श्री. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १८) | श्री. खंडाळे के.एल. | सदस्य |
| १९) | श्री. पिटके एस.एस. | सदस्य |
| २०) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. | सचिव |
| २१) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| २२) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २३) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २४) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २५) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २६) | डॉ. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| २७) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २९) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३०) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३१) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३२) | श्रीमती डॉ. आपटे एस. एस. | सदस्या |
| ३३) | श्रीमती डॉ. रणनवरे जे. डी. | सदस्या |
| ३४) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३५) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३६) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३७) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३९) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४०) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ४१) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४२) | श्री. सलगर बी.एस. | सदस्य |
| ४३) | श्रीमती पाटील एस. एन. | सदस्या |
| ४४) | श्री. रुपनर बी. ए. | सदस्य |
| ४५) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४६) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४७) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ४८) | डॉ.अशोककुमार ई.एन. | सदस्य |
| ४९) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ५०) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ५१) | डॉ.कृष्णमूर्ती एम. | सदस्य |
| ५२) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ५३) | डॉ.बामणे व्ही.के. | सदस्य |
| ५४) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५५) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५६) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ५७) | डॉ. नारायणपेठकर ए. बी. | सदस्य |
| ५८) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५९) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ६०) | श्रीमती गायकवाड जे.एम. | सदस्या |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ.गांधी आर. एच., डॉ.निंबाळकर व्ही.एच., व डॉ.श्रीमती दळवी आर.जे. यांनी पत्राद्वारे तसेच डॉ. वडगावकर पी. पी. यांनी ईमेलद्वारे व श्री. वाघमोडे एस. एम, श्री. व्हनकळस डी. डी, डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर, डॉ. बारबोले ए. एन, श्री. जमादार के. एम., श्री. साळूंखे पाटील डी. बी., डॉ. कदम बी. बी. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाण्यासंबंधी कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

नविन सदस्य श्रीमती गायकवाड जे.एम. जिल्हा परिषद शिक्षण समिती सदस्य व श्री. खंडाळे के.एल. अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी परिषद, श्री. पिटके एस.एस., सचिव विद्यापीठ विद्यार्थी परिषद व यांनी आपली ओळख सभागृहास करुन दिली व सभागृहाने त्यांचे स्वागत केले.

कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना दुसरी अधिसभा व तिसरी अधिसभा बैठक या दरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- शासनाच्या निर्देशानुसार विद्यापीठात शिक्षक व प्रशासकीय सेवकासाठी संगणकीय नोंदणी कार्यप्रणाली (Biomatric System) बसविण्यात आली आहे.
- विद्यापीठात विविध पदावर कार्यरत असलेल्या सहा प्रशासकीय कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आली.
- विद्यापीठात सन २००८ मध्ये रूजू झालेल्या एकूण ४४ प्रशासकीय सेवकांना परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झालेनंतर सेवेत कायम केल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले.
- विद्यापीठाच्या विविध संकुलाकडील रिक्त असलेल्या शिक्षकांच्या मुलाखती महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७६ अन्वये दिनांक १७ व १८ ऑक्टोबर, २०११ रोजी पार पडल्या. निवड झालेल्या पाच शिक्षकांना त्याच दिवशी नियुक्तीचे आदेश पारीत करण्यात आले. त्यापैकी तीन शिक्षक विद्यापीठात हजर झालेले आहेत.
- प्रशासकीय कर्मचा-यांच्या रिक्त असलेल्या वर्ग १ व वर्ग २ पदासाठी दिनांक २८/११/२०११ रोजी मुलाखती घेण्यात आल्या.
- विद्यापीठाच्या विविध संकुलात कार्यरत असलेले प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक अशा एकूण १२ शिक्षकांना सेवेत कायम करण्यात आले.
- विद्यापीठातील विविध संकूलामध्ये प्रवेशित भारत सरकार फ्रिशिप व शिष्यवृत्ती सवलतधारक विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्ती संदर्भात मा. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी दिनांक २६/०९/२०११ रोजी एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केले होते. सदर प्रशिक्षणास विद्यापीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

- विद्यापीठाच्या विविध संकूलाकडे प्रवेशित एकूण तीनशे मागावर्गीय विद्यार्थ्याचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दत्तीने भरून घेण्यात आले आहेत.
- माहिती अधिकार अंतर्गत असलेले अर्ज विहित वेळेत निकाली काढण्यात आले असून सध्या माहिती अधिकार अंतर्गत एकही अर्ज प्रलंबित नाही.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनानुसार सुरू झालेल्या पी. एच. डी. प्रवेश परिक्षेचे आयोजन करून गुणवत्ता यादीमधील विद्यार्थ्यांची ज्या त्या विषयाच्या विभागीय संशोधन समितीसमोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.
- वरिष्ठ वेतन / निवड श्रेणीत स्थाननिश्चितेच्या प्रस्तावाची छाननी करण्यात आली आहे.
- जनविकास केद्रामार्फत नविन अभ्यासक्रम सुरू करण्यासंदर्भात दिनांक २२/०३/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून एकूण ४४ प्रस्ताव प्राप्त झालेली आहेत.
- चेजिस ईन स्टाफसाठी ६५ महाविद्यालयाकडून एकूण ३५० प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.
- मा. अध्यक्ष "**व्हिजन २०२० समिती** "यांनी विद्यापीठाचा व्हिजन २०२० अहवाल तयार करून कार्यालयाकडे सादर केला.
- डिजिटल कॉलेज संकल्पनेवर काम करण्या-या संलग्नित महाविद्यालयीन कर्मचा-यासाठी परीक्षा विभाग व एम. के. सी. एल. यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०७ जुलै, २०११ रोजी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचा एकूण ८४ महाविद्यालयाकडून १५० कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.
- एम. के. सी. एल. यांच्या मार्फत दिनांक १८ व १९ जुलै, २०११ रोजी पुणे येथे कोर्स संदर्भात विद्यापीठामधील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते. सदर प्रशिक्षणासाठी विद्यापीठातील पाच कर्मचारी उपस्थित होते.
- सोलापूर विद्यापीठाचा आठवा युवक महोत्सव दिनांक २२/०९/२०११ ते दिनांक २५/०९/२०११ या कालावधीत ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड टेक्नॉलॉजी अकलूज येथे संपन्न झाला.
- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी केंद्रिय व राज्यलोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे मार्गदर्शन केंद्र माहे नोव्हेंबर, २०११ पासून विद्यापीठात सुरू करण्यात आले. त्यासाठी दहा लक्ष रूपये इतके अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, पुणे यांचे प्राप्त झालेले आहे.
- परीक्षा मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार परीक्षेच्या कामात कसूर केल्याचे आढळून आलेल्या एकूण २३ शिक्षकांना कमीत कमी ₹ ११०/- व जास्तीत जास्त ₹ २०,०००/- पर्यत दंड करून त्यापैकी ९ शिक्षकांना दंडाव्यतिरिक्त परीक्षेच्या कामातून तीन वर्षापर्यत वगळण्याबाबतचा निर्णय अधिकार मंडळाने घेतला.

- शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ रोजी भव्य ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन सोलापूर विद्यापीठाअंतर्गत करण्यात आले होते. सदर रॅलीचे उद्‌घाटन कुलगुरूंच्या शुभहस्ते संपन्न झाले.
- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा बृहत आराखडा स्थानिक वर्तमानपत्रातून आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.
- मा. महालेखापाल, मुबई यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठाचे सन २००८-०९ व सन २००९-१० चे लेखापरीक्षण करण्यात आले असून त्यांनी अपुऱ्या मनुष्यबळामध्ये देखील उत्तम प्रकारे केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.
- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून छत्रपती शिवाजी शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मोहोळ या महाविद्यालयाचे संलग्निकरण काढून घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.
- सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठ स्तरीय अविष्कार महोत्सवाचे आयोजन अभियांत्रिकी महाविद्यालय, गोपाळपूर, ता. पंढरपूर येथे होणार आहे.
- मा. राज्यपाल भवन, मुंबई आयोजित आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील आठव्या आंतरविद्यापीठ **इंद्रधनुष्य** युवा महोत्सव कार्यक्रमात सोलापूर विद्यापीठाच्या वतीने एकूण चाळीस कलाकारांनी सहभाग नोंदवीला. स्पर्धेत वाद विवाद या कलाप्रकारात प्रथम, शोभायात्रा या कलाप्रकारात प्रथम, एकांकिका या कलाप्रकारात तृतीय, भित्तिचित्रन या कलाप्रकारात तृतीय, मुकनाटय या कलाप्रकारात द्वितीय, शास्त्रीय स्वरवाद्य या कलाप्रकारात तृतीय तर पाश्चिमात्य गायन या कलाप्रकारात तृतीय असे एकूण सात बक्षिसे आणि फिरता चषक विद्यापीठ संघाने पटकावला.
- दिनांक २१/११/२०११ ते २४/११/२०११ या कालावधित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे झालेल्या **उत्कर्ष** सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाच्या संघास उपविजेते पदाचा मान मिळाला. त्यामध्ये सोलापूर विद्यापीठास चार सुवर्णपदक, तीन कास्य, तीन ब्रांझ, तीन विशेष पारितोषिके मिळाली.
- कोलकाता विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ डॉयव्हिंग तीन मीटर क्रीडा प्रकारात कु. रसिका श्रीराम हिने रौप्य पदक मिळविले तर श्री. केतन शिंदे याने डॉयव्हिंग एक मीटर व तीन मीटर क्रीडा प्रकारात कांस्यपदक मिळविले.
- पंजाब विद्यापीठ, पतियाला येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ धनुर्विद्या इंडियन राऊंड ५० मीटर क्रीडा प्रकारात कु. अनुराधा पाटील हिने कांस्यपदक मिळविले.
- मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे झालेल्या १५ व्या महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये व्हॉलीबॉल महिला संघाने सलग चौथ्या वर्षी सुवर्णपदक मिळविले. तसेच मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये ॲथेलेटिक क्रीडा प्रकारात कु. अमरजा होटे हिने तिहेरी उडी या क्रीडा प्रकारात रौप्य पदक मिळविले. कु. रेशमा फुगे हिने भालाफेक या प्रकारामध्ये कांस्यपदक मिळविले.

- विद्यार्थी संसद मंडळाची बैठक दिनांक ०७ डिसेंबर, २०१२ रोजी कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीत अध्यक्षपदी श्री. खंडू खंडाळे, सी. बी. खेडगीज् महाविद्यालय, अक्कलकोट यांची तर सचिव पदी श्री. संदीप पिटके, हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर यांची निवड करण्यात आली.
- मा. श्री. जे. पी. डांगे, अध्यक्ष महाराष्ट्र वित्त आयोग यांनी विद्यापीठास दिनांक २० जुलै, २०११ रोजी सदिच्छा भेट दिली.

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.३ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या दुसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/६९२, दि.२९ एप्रिल, अन्वये, दि.३ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या दुसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२९/०५/२०११ अशी होती. या वेळेत श्री. एस. एच. रिसबूड यांनी ठराव क्र. ३ ला दुरुस्ती सुचविलेली होती. त्यानुसार मा.कुलगुरुंनी खालीलप्रमाणे दुरुस्त ठराव स्वीकारलेला आहे.

दुरुस्त ठरावः सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर व त्यास अनुमोदन दिल्यानंतर श्री. एस. एच. रिसबूड यांनी पॉईट ऑफ ऑर्डर मांडली व त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.

१) प्राचार्य डॉ. के. एन. गणगे
२) डॉ. ए. एन. बारबोले
३) श्री. के. एम. जमादार
४) प्राचार्य डॉ. ए. जी. पुजारी
५) डॉ. एन. बी. पवार
६) श्री. बी. पी. रोंगे
७) डॉ. सी. एस. चव्हाण
८) डॉ. पी. बी. जोशी
९) श्री. बी. आर. गायकवाड

तसेच वित्त व लेखा अधिकारी यांनी प्रशासकीय निवेदन केले. सभागृहाच्या विनंतीनुसार श्री. एस. एच. रिसबूड यांनी आपली पॉईट ऑफ ऑर्डर मागे घेतली व तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. ए. बी. सूर्यवंशी यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.
सबब, मान्यतेस्तव सादर).

**ठरावः दि.०३ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या अधिसभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.

(टिपणी: परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र. ४७६(७) अन्वये पाठविण्यात येतील).

ठराव: **अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:२४ वाजता सुरु झाला व दुपारी १:१५ वाजता संपला.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**
**क) प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न क्र. १ ते १२ व त्यावर सदस्यांनी विचारलेल्या उपप्रश्नांची उत्तरे देण्यात आली.**

[ ३ ] सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.

(टिपणी: सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत दि.२८/०२/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. १८ नुसार व्यवस्थापन परिषदेची शिफारस दि.०३/०४/२०११ रोजीच्या अधिसभेच्या सभेत विषय क्र. ३ अन्वये सादर करण्यात आली असता, सदरचा अहवाल तांत्रिक कारणास्तव मागे घेण्यात आला.

वित्त व लेखा समितीच्या दि.०३/११/२०११ रोजीच्या सभेतील विषय क्र. ०२ अन्वये व्यवस्थापन परिषदेस सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत शिफारस करण्यात आली असता, व्यवस्थापन परिषदेने वित्त व लेखा समितीची शिफारस स्वीकारुन अधिसभेस शिफारस केलेली आहे.

प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २६ (२) नुसार सन २००९-१० च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ).

ठराव: **सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**
**१) डॉ. बी. पी. रोंगे**
**२) श्री. एस. एच. रिसबूड**
**३) प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे**
**त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ४ ] सोलापूर विद्यापीठाच्या सन २००९-१० या वर्षाच्या ६ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.

प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन सोलापूर विद्यापीठाचा ६ वा वार्षिक अहवाल मंजूर करण्यात यावा."

(टिपणी:- सोलापूर विद्यापीठाचा ६ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने बैठका घेवून वार्षिक अहवाल तयार करुन दिलेला होता. सदरच्या अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.३०/०९/२०११ रोजीच्या सभेतील विषय क्र. ६ वरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

" सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-१० चा वार्षिक मराठी अहवाल स्विकारुन अधिसभेस शिफारस करण्यात आला. "

सबब, सन २००९-१० च्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ).

**ठराव: सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

B.Ed, B.P.Ed, M.Ed, M P. Ed या आभ्यासक्रमांना असलेली सत्र परिक्षा पध्दती रद्द करावी अशि शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. यु. व्ही. भोसले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परक्षेच्या तारखा त्यांच्या स्पर्धेच्या वेळेस असल्यास त्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा त्यानंतर स्वतंत्रपणे घेण्याची शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. चौगुले एस. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ७ ] अधिसभा सदस्य डॉ. गायकवाड एस. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रियांच्या धर्तिवर, Ph.D. प्रवेश प्रक्रिया सगळ्या जागा भरेपर्यंत अथवा पात्र उमेदवार ऊपलब्ध आहेत तोपर्यंत राबवावी, अशी शिफारस अधिसभेने विदयापिठ व महाविदयालय विकास मंडळास करावी.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. चव्हाण सी. एस. यांनी अनुमोदन दिले. तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. गायकवाड एस. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ८ ] अधिसभा सदस्य डॉ. गायकवाड एस. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

PET पात्र असणाऱ्या परंतू Ph.D साठी प्रवेश न मिळालेल्या उमेदवारांना पुढील सलग दोन PET मधून सुट मिळावी आणि त्या उमेदवारांना Ph.D साठी च्या मुलाखतीसाठी पात्र समजावे अशी शिफारस अधिसभेने विदयापिठ व महाविदयालय विकास मंडळास करावी.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. सुर्यवंशी ए. बी. यांनी अनुमोदन दिले. तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. गायकवाड एस. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

सोलापूर विद्यापीठासाठी स्थापन झालेल्या शिक्षण सह. संचालकाच्या कार्यालयात शिक्षण सह. संचालक व इतर कर्मचारी वर्ग यांची तातडीने नेमणूक करावी यासाठी विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाकडे प्रयत्न करावेत अशि शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कोळेकर टी. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ १० ] अधिसभा सदस्या डॉ. दळवी आर. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

विना अनुदानीत B.Ed. , B.P.Ed., अभियांत्रीकी व फार्मसी महाविद्यालयात सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी ताबडतोब करावी आशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे.

ठरावः **सदरचा ठराव डॉ. दळवी आर. जे. यांच्या वतीने डॉ. पवार एन. बी. यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. बामणे व्ही. के. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. पवार एन. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ११ ] अधिसभा सदस्य डॉ. गायकवाड एस. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

जे प्राध्यापक अधिसभा सदस्य आहेत त्यांना अधिसभा सदस्यत्वाच्या कार्यकाळात परिक्षेच्या कामकाजातून सवलत मिळावी अशी शिफारस अधिसभेने विदयापिठ परिक्षा मंडळास करावी.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. इंगोले के. जे. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. गायकवाड एस. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ १२ ] अधिसभा सदस्य डॉ. इंगोले के. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक ५ जाने २०११ च्या संगणकीय नोंदणी कार्ड प्रणाली (Biometric Card System) बाबतच्या परिपत्रकाचे तंतोतंत अमलबजावणी करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बाड डी. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. इंगोले के. जे. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरू** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**जोडपत्र "अ"**

**विषय क्र. ०२ चे सहपत्र**

**अधिसभेच्या शुक्रवार, दि.०९ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● १ | **श्रीमती विभूते एस. बी.**<br>सिनेट सदस्यांनी विद्यापीठाकडे विद्यापीठाच्या कामकाजासंबंधी मागीतलेली माहीती त्यांना दिली जाते का?<br>● नसल्यास त्याचे कारण काय?<br>● आजपर्यन्त अशा किती सदस्यांनी अशी माहीती मागीतली आहे ? | ● **ॲड. सलगर बी. एस.**<br>- होय.<br>- प्रश्न उद्‌भवत नाही.<br>- एकही नाही. |
| ● २ | **डॉ. इंगोले के. जे.**<br>महाराष्ट्र शासनाच्या दि. ५ जानेवारी ११ च्या संगणकीय कार्ड प्रणाली परिपत्रकाची तंतोतंत अमलबजावणी केली आहे काय ?<br>● संगणकीय कार्डप्रणाली महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्तीशी संबंधीत असलेमुळे शिक्षकांच्या परिनियमात तसे बदल केले आहेत काय ?<br>● तंतोतंत अमलबजावणी करणेबाबत SUTA ने काही पत्रे पाठविली आहेत काय ?<br>● SUTA ने किती पत्रे पाठविली आहेत ?<br>● SUTA ने एकूण तीन पत्रे पाठविली आहेत. २६/०९/२०११, १५/०६/२०११ व ०४/०७/२०११ याबाबत काय कार्यवाही केलेली आहे ?<br>● तंतोतंत म्हणजे काय ?<br>● नेमकी कार्यपध्दती काय असावी याबाबत त्यामध्ये कोणतेही आदेश नाहीत?<br>● संघटनेने उपस्थित केलेल्या मुद्यांप्रमाणे कळविले आहे काय ?<br>● SUTA ने तीन पत्रे पाठविली आहेत ? | ● **डॉ. सूर्यवंशी ए. बी.**<br>- शासन परिपत्रकानुसार सर्व महाविद्यालयांना अंमलबजावणीसाठी कळविण्यात आले आहे.<br>- नाही.<br>- होय.<br>- एक.<br>- ०१ मार्च २०११ रोजी सर्व सलग्नित महाविद्यालयांना परिपत्रक पाठविले आहे. ०८ एप्रिल, २०११ रोजी स्मरणपत्र पाठविले आहे. त्यानंतर ०३ नोव्हेंबर, २०११ रोजी तिसरे पत्र याचसंदर्भात महाविद्यालयांना पाठविले आहे आणि तंतोतत अनुपालन करावे व अहवाल पाठवावा असे कळविले आहे.<br>- जसा शासनाचा निर्णय आहे त्याची तंतोतंत अंमलबजावणी करावी.<br>- यासंदर्भात दि.०५ जोनवारी २०११ च्या शासन निर्णयातील (क) आहे.<br>- तीन पत्रे पाठवली आहेत त्यातील आशय एकच आहे.<br>- तीन पत्रे पाठवली आहेत त्यातील आशय एकच आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • तीनपैकी एका पत्रात आंदोलनाचा इशारा दिला होता त्याबाबत काय कार्यवाही ?<br>• किती महाविद्यालयाकडून अनुपालन अहवाल प्राप्त झाली आहेत ?<br>• न आलेल्या अहवालाबाबत काय ?<br>• Departure timing विषयी आणि Thumbing विषयी प्राचार्यांना काही कळविले आहे काय?<br>• शासन निर्णयास मंजूरी अधिकार मंडळाकडून घेतलेली आहे काय ?<br>• Biometric Thumb बाबत शासनाचा निर्णय काय आहे ?<br>• Biometric, UGC च्या सेवाशर्तीशी संबंधित आहे काय ? | - तीन परिपत्रके पाठविली.<br>- ६५<br>- त्यांना स्मरण पत्र पाठवले आहे. ३०/०९/२०११ पर्यंत अंतिम मुदत दिली असून प्राचार्यांवर सर्वस्वी जबाबदारी टाकली आहे.<br>याबाबत शासन निर्णय जसा आहे तसा महाविद्यालयाकडे पाठविला आहे व त्यानुसार अंमलबजावणी करावी असे कळविले आहे.<br>होय.<br>शासन निर्णय पाठविले आहे.<br>नाही. |
| ३ | **श्री. चौगुले एस. एस.**<br>महाविद्यालयातील किती शिक्षकांना Professor पद देण्यात आले आहे ?<br>• विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील इतर महाविद्यालयातील शिक्षकांना Professor पद देण्यात आले नाहीत काय ?<br>• इतर महाविद्यालयातील Professor पद देण्याबाबत काय?<br>• सर्व महाविद्यालयातील Professor पद दिले आहे काय ?<br>• कार्यवाही कधी पूर्ण होईल ? | • **प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.**<br>अभियांत्रिकी महाविद्यालयात १० शिक्षकांना प्राध्यापक पद देण्यात आले आहे.<br>कार्यवाही चालू आहे.<br>- कार्यवाही सुरु आहे.<br>- फक्त अभियांत्रिकी विद्याशाखेतील.<br>कार्यवाही सुरु आहे. |
| ४ | विद्यापीठातील अधिविभागात (school) २०११-१२ या वर्षात किती प्राध्यापक व किती सहयोगी प्राध्यापक नेमलेले आहेत ? | ०१ प्राध्यापक, ०१ सहयोगी प्राध्यापक. |
| ५ | सोलापूर विद्यापीठाचे परिनियम तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीने परिनियम तयार केले आहेत काय ? | कार्यवाही सुरु आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | **श्री. गायकवाड एस. पी.** | ● **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| ६ | विज्ञान विद्या शाखेत संशोधक म्हणून कार्य करण्यासाठी संशोधकाने पूर्ण वेळ संशोधन केले पाहीजे अशी सम्मती कोणत्या अधिकार मंडळाने दिलेली आहे ? | विज्ञान विद्याशाखेतंर्गत विभागीय संशोधन समितीने असा ठराव संमत केला आहे. |
| | ● केवळ विज्ञान शाखा अंतर्गत पार्ट टाईम रिसर्च करता येत नाही का ? | करता येते. |
| | ● विज्ञान शाखेला पार्ट टाईम रिसर्च पासून का रोखले? | Departmental Research Committee ने निर्णय घेतलेला आहे. |
| ७ | वनस्पतीशास्त्र या विषयात Ph.D. करण्यासाठी किती उमेदवार पात्र होते ? | - १२ |
| | ● किती उमेदवाराना प्रवेश दिला आहे ? | - एकही नाही. |
| | ● दिला नसल्यास का दिला नाही ? | - कारण पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीन्वये संबंधित मार्गदर्शकाने दिलेल्या संमतीपत्रानुसार गुणानुक्रमे ४ विद्यार्थ्यांना विभागीय संशोधन समितीसमोर मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी २ विद्यार्थी अनुपस्थित व उर्वरीत २ विद्यार्थ्यांना Area Specialization Mismatch मुळे विद्यार्थी प्रवेशित केलेले नाहीत. |
| | ● चारही जागा रिकाम्या असतील तर दुसरा राऊंड का घेण्यात आला नाही ? | सर्व विषयांचा पहिला राऊंड पूर्ण झाल्या शिवाय दुसरा राऊंड घेता येत नाही. |
| | ● पहिला राऊंड पूर्ण होण्यासाठी किती दिवस आणखी लागणार आहेत ? | लवकरच पूर्ण होईल. |
| | **डॉ. भोसले यु. व्ही.** | ● **डॉ. सूर्यवंशी एस. एस.** |
| ८ | २०१० च्या UGC Regulation प्रमाणे तयार केलेल्या Self apprisal form चे विस्तारीकरण (detailing) करण्यासाठी SUTA संघटनेने विद्यापीठाला पत्र दिले आहे काय ? | - होय. |
| | ● Self apprisal form चे विस्तारीकरण करणेसाठी विद्यापीठाने समिती नेमावी असे पत्र SUTA ने दिलेले होते काय ? | - नाही. |
| | ● विद्यापीठाने समिती न नेमण्याचे कारण काय ? | - समिती नेमली आहे. |
| | ● समिती केव्हा नेमली आणि त्याची काय कार्यवाही झाली ? | - १५ दिवसापूर्वी समितीची पहिली बैठक झाली आहे. |
| | ● कार्यवाही का झाली नाही ? | - पहिली बैठक झालेली आहे. कार्यवाही सुरु आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● ९ | **<u>डॉ. शिंदे एस. व्ही.</u>**<br>विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामकाजात झालेल्या चुकामुळे अधिकार मंडळावरील किती सदस्यांवर विद्यापीठाने कारवाई केली आहे ? | ● **प्राचार्य श्री. पवार एस. के.**<br>दोन |
| | ● असल्यास कोणती कारवाई, कोणविरुध्द केली आहे त्यांची नावे कोणती ? | ● प्रा. डॉ. बी. एस. बिराजदार यांना रु.१०,०००/- दंडासह सप्टेंबर २०१४ पर्यंत परीक्षा कामातून निष्काशित करण्यात आले आहे. त्यानुसार म.वि.का. १९९४ मधील कलम ४४ (ई) नुसार त्यांचे मराठी अभ्यासमंडळ व अधिसभेवरील सदस्यत्व संपुष्टात आले आहे.<br>● प्रा. श्रीमती उषा सासनूर यांना रु.३,०००/- दंडासह सप्टेंबर २०१४ पर्यंत परीक्षा कामातून निष्काशित करण्यात आले आहे. त्यानुसार म.वि.का. १९९४ मधील कलम ४४ (ई) नुसार त्यांचे इंग्रजी अभ्यासमंडळ व कला व ललित कला विद्याशाखेवरील सदस्यत्व संपुष्टात आले आहे. |
| | ● प्रश्न पत्रिकेतील झालेली चूक ही परीक्षेतील गैरव्यवहार ठरू शकते काय? | होय. |
| | ● रूपये १०,०००/- दंड झाले आहे हे कोणत्या नियमानुसार ? | नियम दिलेले आहे. |
| १० | सन २०११-१२ या शैक्षणीक वर्षात विद्यापीठाच्या विविध शैक्षणीक संकुलात किती प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक नेमलेले आहेत त्यांची नावे व त्यांच्या नेमुकीच्या वेळचा क्रायटेरीया निहाय API Score किती होता ? | -दोन<br>-डॉ. राजपूत जी. जी. प्राध्यापक (API - 424)<br>-डॉ. हेगडी आर. एस. सहयोगी प्राध्यापक (API-397) |
| ● ११ | **<u>डॉ. भिलेगावकर एस. डी.</u>**<br>M.Phil. (शिक्षणशास्त्र) च्या प्रवेश समिती सदस्यांची पात्रता / निकष काय आहेत ? | ● **प्राचार्य डॉ. गणगे के. एन.**<br>याबाबत स्वतंत्र नियमावली नाही. |
| | ● त्या समितीत कोणकोण होते ? | संबंधित विभागप्रमुख व शिक्षक होते. |
| | ● त्यांची नावे काय ? | डॉ. श्रीकांत अंधारे - विभागप्रमुख,<br>श्री.जी.टी.जमादार - सहाय्यक प्राध्यापक,<br>श्रीमती एम. एस. म्हेत्रे - सहाय्यक प्राध्यापक |
| | ● ते संशोधक मार्गदर्शक आहेत काय ? | प्रश्नच उद्‌भवत नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| १२ | दिनांक २४.१२.२०१० रोजीच्या अधिसभेत School of life Science ची स्थापना करण्याचा ठराव एकमताने झाला होता त्याची काय कार्यवाही झाली आहे? | सदरचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. |
| | ● हा प्रस्ताव शासनाकडे कधी पाठविलेला आहे ? | दिनांक १८ जुलै, २०११ रोजी. |
| | ● Follow up घेतलेला आहे काय ? | Followup चालू आहे. |
| ● | **डॉ. कोळेकर टी. एन.** | ● **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| १३ | प्राचार्यपदाच्या नेमणूकीस मान्यता देताना API व वेटेज पॉईंट पुर्ण करण्याच्या अटीवर पदमान्यता दिली आहे काय? | नाही. |
| | ● असल्यास कोणत्या महाविद्यालयातील प्राचार्यांना अशी मान्यता दिलेली आहे ? | प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | ● नवीन निकषानुसार किती प्राचार्यांची नेमणूक केली? | एक. |
| | ● कोणत्या महाविद्यालयात ? | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर. |
| १४ | UGC Regulation ला विद्यापरिषदेने मान्यता देणे आवश्यक आहे काय ? | नाही. |
| ● | **डॉ. चव्हाण सी. एस.** | ● **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| १५ | विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देण्यासंबंधी काय कार्यवाही करण्यात आली आहे ? | यासंदर्भात कार्यवाही चालू आहे. |
| | ● नेमकी काय कार्यवाही चालू आहे ? | रसायनशास्त्र विषयास प्रथम येणाऱ्यास सुवर्णपदक देण्यासाठी स्विकारणाच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने दि.११/११/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे. |
| | ● एकूण किती विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देणार आहेत? | त्यासंबंधी समिती नेमली आहे. |
| | ● देणगी दिल्या नंतरच सुवर्ण पदक दिले जाते काय ? | विद्यापीठामार्फतही सुवर्णपदके दिली जातात परंतू विद्यापीठ नवीन असल्याने विद्यापीठाच्या Priority वेगळया आहेत. |
| १६ | Ph.D. संशोधन सुविधा केंद्राकरिता नेमण्यात येणाऱ्या स्थानिक चौकशी समिती करिता Ph.D. प्राप्त नसणाऱ्या प्राध्यापकांची सदस्य अथवा अध्यक्ष म्हणून नेमणूक करता येते काय ? | होय |
| | ● स्थानीक चौकशी समिती पदव्यूत्तर विभागाकरीता नेमत असताना देखील प्रोफेसर ग्रेडचा माणूस लागतो तर Ph.D. करीता संशोधन समिती नेमत असताना Ph.D. नसणारा माणूस संशोधन केंद्र मंजूर करण्यासाठी कसा जातो ? | Ph.D. संशोधन सुविधा देण्यासाठी Infrastructure आहे किंवा नाही हे पाहावे लगते. त्यासाठी अनुभव हा महत्त्वाचा आहे म्हणून अनुभवी व्यक्ती नेमलेली असते. |
| | ● Ph. D. प्राप्त असणारे प्राध्यापक उपलब्ध असतील तर Ph.D. प्राप्त नसणारे प्राध्यापकाला का Preference दिला जातो ? | प्राध्यापकांच्या अनुभवाला प्राधान्य दिले जाते व अनुभवी प्राध्यापक हे सोयीसुविधा बघू शकतात. |
| १७ | ३२/५ च्या समितीची बैठक केवळ अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांना बोलावून घेणे कायदेशिर आहे काय ? | नाही |